# फुलराणी



IRBK-0103133

IRBK-0103133

ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का० वा०
क्र. 3933

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

IRBK-0103133

IRBK-0103133

प्रथमावृत्ति सन १९४६ ]

[ किंमत ५ आणे

प्रकाशिका :
कु. ताराबाई जाधव,
कोल्हापूर.

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण—
महाराष्ट्र ग्रंथभांडार, कोल्हापूर.

मुद्रक :
रघुनाथ दिपाजी देसाई,
न्यू भारत प्रिं. प्रेस,
६ केळेवाडी, मुंबई ४

३९३ ... ३९३३

# फुलराणी

मनोरमा म्हणून एक मुलगी होती. ती फारच सुंदर होती, हुषार होती आणि चलाख पण होती. ती सर्वांना अतिशय आवडे. तिच्या घरची मात्र फार गरिबी होती. तिची आई मोलमजूरी करी नी माईलेकरांचें पोट भरी.

आई बाहेर गेली म्हणजे मनू शेजारच्या घरीं जाई, तिथल्या मुलींशीं खेळे, त्यांच्या बरोबर गाणीं म्हणे, तिथेंच राही.

त्या मुलांना शिकवायला त्यांचे शिक्षक येत. त्यावेळीं मनू पण थोड्या अंतरावर बसे. ते मुलांना शिकवूं लागले म्हणजे लक्षपूर्वक ऐके. तिला अक्षर-ओळख होऊं लागली. वाळूंतले रंगीत खडे घेऊन ती शेजारच्या देवळांत जाई व तिथल्या फर्शीवर अक्षरें काढण्याचा प्रयत्न करी. पुढें तिला थोडं थोडं वाचतां पण येऊं लागलं. पडलेले कागदाचे तुकडे घेऊन ती वाचीत बसे.

—आईला तिचं फार कौतुक वाटे. आणि आपल्या सोन्यासारख्या मुलीला आपल्या गरीबीमुळं चांगलं वागवतां येत नाहीं, चांगले कपडे घेतां येत नाहींत, दागिने तर सोडा पण शाळेंत पाठवायचं म्हटलं तरी पाटी, पुस्तकं कुठून आणायची ! तिची कसल्याही तऱ्हेची हौस आपल्याला पुरवतां येत नाहीं म्हणून ती फारच कष्टी होई.

एकदां मनूची आई आजारी पडली, बिचारी मनू अगदीं घाबरून गेली. तिला कांहीं सुचेना. औषध तरी कोण देणार ! शेजारच्या आयाबायांनीं कांहीं काढा वगैरे करून दिला. पण काय होणार त्यानें ? आणि किती दिवस देणार त्या ! आजार तर सारखा वाढतच होता. मनूला वाटे वैद्य बुवाचें औषध आणावें, पण ते कसे देणार पैशाशिवाय ? शेवटीं जें व्हायचं तेंच झालं !—एके दिवशीं मनूची आई देवाघरीं गेली. मनूनं नुसता रडून रडून गोंधळ केला. तिला कुणाचाच आधार उरला नाहीं. मनू पोरकी झाली. शेजाऱ्यांनीं समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला. तिला दोन दिवस ठेवून घेऊन जेवा-

यला घातलं, पण रोजरोज कोण घालणार ? तीहि लोकांचीं भांडीं घासूं लागली. काम झालं म्हणजे कुणी कांहीं उरलं तर देत, तें ती घरीं आणी अन् खाऊन राही.

मनू फार प्रामाणिक मुलगी होती, ती कधीं कुणाची कसलीहि वस्तु पडो तिला हात लावीत नसे. कुणी कांहीं काम सांगितलं तर नाहीं म्हणायची नाहीं; लोकांनीं दिलेलं अन्नच का असेना, पण ती खात असली अन् कुणी मागितलं तर ती आनंदानं देई व आपण क्वचित् उपाशीहि राही. ती ज्या ज्या घरांत कामाला जाई, त्या घरांत ती आपलेपणानें वागे. त्यांच्या चालीरीती, वागणूक, लक्षपूर्वक पाहून त्या लक्षांत ठेवी. कित्येक वेळीं घरच्या बाईंनीं जरी एखादी गोष्ट विसरली असली तरी मनू "काकू हें पण करायचं असतं ना ?" असं विचारून त्यांना आठवण करून देई. त्यांच्या घरांत सामान सुमान असं कांहीं व्यवस्थित लावून ठेवी कीं, सर्वांना त्याचं आश्चर्य वाटे ! तिथं तिची एकच इच्छा व त्यासाठीं धडपड चाले कीं, एखादं पुस्तक

वाचायला मिळावं, आणि त्याप्रमाणं मिळालं कीं, अत्यानंद होई तिला !

तिच्या घराजवळ एक तळं होतं, त्या तळ्यांत पुष्कळ कमळं होतीं. पाण्यांत पांढरे शुभ्र राजहंस सुरकांड्या मारीत. बदकं खेळत, व पाणकोंबड्या पोहत असत. कांठावर खूपशीं रानफुलं सदा फुललेलीं असत, पण त्या फुलांकडे कोण पाहणार ? त्यांना कोण घेणार ? झाडावरच फुललेलीं असायचीं तीं ! फुलपांखरं त्यांच्यावरनं सारखीं नाचायचीं अन् बागडायचीं ! मनोरमा सदा या फुलांतच असायची. रानफुलांची वेणी करावी, दागिने करावेत अन् ते घालून मिरवावं. कानांत फुलं, हातांत फुलं, केसांत फुलं, सदान्‌कदा फुलंच फुलं भरलेलीं असायचीं म्हणून सगळ्या मुली 'फुलराणी' म्हणत तिला ! तिला पण तें आवडे !

ती कधीं कधीं त्या तळयाच्या कांठीं पण बसून जेवी. ती जेवत असतांना तळयांतली कोंबडीं, बदकं, राजहंस तिच्याजवळ येत. त्यांना ती अन्न घाली. त्यांच्या बरोबर खेळे. मनोरमा येतांना दिसली कीं,

तीं आनंदानं नाचत, ओरडत एकमेकांना ढकलत पुढें येत. त्यांची ती दोन्हीं अंगावर डुलत चालण्याची ऐटबाज ढब मनोरमा पाहातच राही! तळ्यांत पाय सोडून मनोरमा बसली कीं, तिच्या भोंवती तीं सारीं जमत. मग अशी कांहीं शोभा दिसे—जणूंकाय देवी सरस्वतीच बसून गाणं गाते आहे असं वाटायचं! त्यांतला एक हंस फार हुशार होता. तो येतांना चोंचींतून एक फूल आणी अन् मनोरमेला देई. तें घेऊन तिनं त्याच्या पाठीवरून हात फिरवला म्हणजे त्याला इतका आनंद होत असे कीं, क्वॉं क्वॉं क्वॉं क्वॉं करून नाचत आपल्या सोबत्यांत जाऊन मिसळे. ती असे तोपर्यंत सर्व जण तिथेंच घुटमळत; मनोरमा परत गेल्यानंतर तीं परत जात. मग ती या फुलाजवळ जा, त्या फुलाजवळ जा, याचा वास घे. त्याचा वास घे, असं करीत घरीं जाई.

एकदां काय झालं, ती शेजारच्या घरीं गेली. तिथं तिला बरीचशी गडबड नी गोंधळ चालल्याचें दिसलें. नंतर तिला समजलें कीं, तिची मैत्रीण सुंदर ही परगांवीं जाणार होती. म्हणून ही गडबड चालली होती.

त्या देशाच्या राजकुमारानें आपल्या राज्यांतल्या सुंदर व हुषार अशा तरुण मुलींना मेजवानी द्यायचं ठरवलं होतं. त्यावेळीं त्या मुलींतून जी मुलगी पसंत पडेल तिच्याशीं तो लग्न करणार होता.

राजपुत्र पण फार सुंदर, हुषार व सद्गुणी म्हणून प्रसिद्ध होता. अशा वेळीं साऱ्या सुंदर मुलींच्या आई-बापांची धांदल उडाली असल्यास काय नवल ? कपड्यासाठीं व दागिन्यासाठीं पाण्यासारखा पैसा खर्च होत होता. त्यांची जाण्याची तयारी चालू होती. मनूला पण साहजीकच वाटलं " आपण पण जावं." ती एका मुलीला म्हणाली, " काय ग आपणही गेलों तर ? आपल्याला नाहीं का मिळणार परवानगी ?" ती म्हणाली " हो हो तर ? जा ना अगदीं अवश्य जा !! तुझ्या ह्या अवताराला बघून लागलीच पसंत करतील युवराज ! आतां आहेसच ना चिंध्यांची राणी ? मुलींनीं थट्टेनं 'फुलराणी' म्हटलं म्हणून तुला खरीच राणी आहेसं वाटूं लागलं वाटतं ! जा ना, कोण नको म्हणतंय."

त्या मुलीचं तें बोलणं ऐकून मनोरमेला आपण

कुठून बोललोंसं झालं ! तिच्या डोळ्यांना टचकन् पाणी आलं ! ती बाहेर पडली. तिला कांहीं सुचेना, ती तशीच तळ्याकडे आली आणि पाण्यांत पाय सोडून बसली. मनांत म्हणाली " खरंच माझ्या सारख्या दरिद्री मुलीला कोण आंत सोडील ? भिकारीण म्हणून हाकलून देतील बाहेर, ना मला चांगला कपडा, ना अंगावर एखादा दागिना, माझ्या सारखीला कसं जायला मिळेल तिथं ! कित्ती मजा असेल तिथं ! तें पाहायचं कुठलं आपल्या नशिबांत ? असा विचार करित ती बसली होती. नेहमीं प्रमाणें तिचे मित्र—हंस—बदक, कोंबडीं जवळ आलीं तिच्या, पण तिचं लक्ष त्यांच्याकडं गेलं नाहीं. ती समोर शून्य दृष्टि लावून बसली होती. तिच्या डोळ्यांतून सारख्या पाण्याच्या धारा चालल्या होत्या. त्या मोठ्या राजहंसानें नेहमीप्रमाणें कमळ आणलं व तें लांब मान करून तिच्या मांडीवर ठेवलें. तेव्हां तिचं लक्ष त्याच्याकडे गेलं. तिनं तें घेतलं नी आंतल्या पाकळ्या उघडून पाहूं लागली. कित्ती सुंदर गुलाबी रंग होता त्यांचा ! नाजुक तरी किती ! ती हंसली, त्यांना

म्हणाली " हें पहा मला कीं, नाहीं उद्यां खूपशीं कमळं पाहिजेत, द्याल ना आणून ? त्यांनीं क्वा क्वा क्वा क्वा करून मोठ्या आनंदानं संमति दर्शविली.

दुसरे दिवशीं सकाळींच तिनं सर्व कामं वगैरे उरकलीं; थोडं खाऊन घेतलं, आणि तळ्याकडं गेली. नेलेलं अन्न त्यांना घातलं, अन् म्हणाली—" चला आतां काढूं या आपण कमळं. " तिनं आणि हंसांनीं बदकांनीं मिळून खूपशीं कमळं काढलीं. अगदीं दूरचीं निळीं नी पांढरीं कमळं पण हंसांनीं काढून दिलीं. तीं सर्व तिनं बांधून घेतलीं, आणि शेजारच्या शहरीं युवराजांची मेजवानी होती तिकडे गेली.

मेजवानीचा बेत खूप मोठा होता. वेळ संध्याकाळची होती. एक मोठा तंबू उभारला होता. त्याला कडेनं रेशमी झालर लावली होती. आंत मोठे मोठे झुंबर लावले होते. शभर, शंभर, हजार हजार मेणबत्तींचीं बिलोरी झाडें पेटवून ठेवलीं होतीं. हंड्या किती होत्या त्याला तर सीमाच नव्हती. खालीं भरजरी, किनखापी पोमी आंथरली होती. कडेनें मोठमोठे लोड व तक्के लावले होते. उंची अत्तरांचा

अनुक्रम 20133

व अत्तरांच्या दिव्यांचा सुगंध दरवळला होता. अगरबत्त्या नी उदबत्त्यांचा तर हिशेबच नव्हता.

नोकरचाकर खूप होते. ते कामासाठीं इकडून तिकडे सारखे फिरत होते पण गडबड नी गोंधळ मुळींच नव्हता. नोकरांचे भरजरी कपडे चमकत होते नुसते ! मुली जमूं लागल्या. स्वतः युवराजांनीं पांढरा शुभ्र पोशाख केला होता. गळ्यांत एक मोत्यांचें पेंढें व बारिकशा नाजुक कवड्यांची माळ घातली होती. हातांत एक टपोऱ्या गुलाबाची लहानशी फांदी घेतलेली व कमरेला कट्यार खोवलेली अशा वेषांत ते इकडून तिकडे फिरत होते.

सरदारांच्या, जमीनदारांच्या, इनामदारांच्या शेट सावकारांच्या, सुखवस्तु माणसांच्या अनेक सुंदर मुली आपल्या कडून शिकस्तीची तयारी करून आल्या होत्या. युवराज हंसून त्यांचं स्वागत करीत होते. त्यांना योग्य त्या ठिकाणीं नेऊन बसवीत होते. बहुतेक सर्व मुली आल्या, आतां मेजवानीसाठीं दुसऱ्या दालनांत जावयाचें इतक्यांत एक मुलगी येतांना दिसली.

ती अतिशय सुंदर दिसत होती. तिचा पोशाक तरी असा कांहीं होता कीं, जणूंकाय कमळांतली लक्ष्मीच ! तिनं परकर घातला होता त्या परकराला कमळाच्या गुलाबी पाकळ्या अशा कांहीं शिवल्या होत्या कीं, पाकळ्यांचाच तो सुकुमार परकर बनवला आहे असें वाटत होतें. निळ्या कमळाच्या पाकळ्या जोडून पोलकें व पांढऱ्या कमळाच्या पाकळ्या जोडून ओढणी बनविली होती. ओढणीचा पदर तिनं डावीकडून घेतला होता. ती रजपूतराणी सारखी शोभत होती. हातांत, कानांत, नाकांत, गळ्यांत फुलांचेच दागिने घातले होते. पायांत सोनचाफ्याच्या तोरड्या घातल्या होत्या. त्या महाराणीच्या सोनसाखळ्या प्रमाणें शोभत होत्या.

युवराज स्वागतासाठीं उभे होते.

ती आली, पाहते तों पायांत गुलाबाचीं फुलें पडलेलीं. ती तीं वेचूं लागली. कांहींच्या पाकळ्या गळल्या होत्या, कांहीं तुडवलीं गेलीं होतीं, कांहींचा चिरडून चिखल झाला होता. तें पाहून तिला फारच वाईट वाटलें, ती हळहळली व म्हणाली—" अरेरे

कोण निर्दय माणसं हीं ! किती सुंदर नी नाजुक फुलं हीं ? अशीं कशीं टाकलीत कोण जाणे ! कायरे बाबांनो तुमची ही दशा ! ही अशीच का राजे लोकांची रीत असते ? मोठे तितके खोटेच म्हणायचं हें ! उगीच आलें मी ! हेंच का इथं पहायचं ? आणि हें काय ?....पुस्तक !....रामचरित्र !....आणि इथं ? धन्य आहे ! इतकी का किंमत आहे इथं ज्ञानाला अन् विद्येला ? आणि विद्वान् आहेत म्हणे युवराज !! " असं म्हणून तिनं तें पुस्तक उचललं, मस्तकाशीं लावलं, वर पाहते तों समोर युवराज उभे ! तिला कांहींच कळेना, त्यांच्या एकंदरीत रुबाबावरून व थाटावरून ते युवराज असावेत असें तर तिला वाटलेंच. पण ते या—अशा—साध्या शुभ्र पोशाखांत कसे असतील ? " ती गप्पच उभी राहिली, तिला कांहींच सुचेना, शेवटीं युवराजच म्हणाले, " चला ना आंत. "

" पण हें पुस्तक....रामचरित्र....इथं कां टाकलं आहे ? "

" तें तुम्ही उचलून आणावं म्हणून ! "

" म्हणजे ? "

" म्हणजे कांहीं नाहीं. चला ना आंत "

मुलगी आंत गेली. तिनं पुस्तक अन् फुलं योग्य जागीं ठेवलीं. युवराजांनीं तिला योग्य जागीं बसविलें.

सगळ्या मुली कुजबुजूं लागल्या, " हें काय हें ! हें एक सोंगच दिसतंय ! आचरटासारखं नी बावळटासारखं रस्त्यावरचीं फुलं कशाला आणलीं हिनं ! आणि पुस्तक उचलून आणायला काय नोकर चाकर नाहींत ? आपण कशाला आणायचं तें ! दरिद्री लक्षण ! दुसरं काय ?

नंतर मेजवानीसाठीं ती मंडळी दुसऱ्या दालनांत गेली. तिथें तिला चांगल्या ठिकाणीं युवराजांच्या शेजारीं बसण्याची व्यवस्था केली होती. युवराज मधून मधून तिच्याशीं बोलतही पण होते. तिला जरी कांहीं माहिती नव्हती तरी ती दुसऱ्यांच्याकडे पाहून मोठ्या चातुर्यानें सर्व कांहीं व्यवस्थित करीत होती. जसं काय ही नेहमींच राजे रजवाड्यांतून वावरणारीच मुलगी असावी ! मेजवानी झाली. गप्पागोष्टी झाल्या, मुलींनीं गाणीं म्हटलीं; त्यावेळीं या मुलीनेंहि गाणें

म्हटलें. तें युवराजांना फार आवडलें. साधी कविता होती ! पण तिनं म्हटली छान ! अर्थ पण चांगला होता तिचा ?

त्यानंतर पुन्हा पहिल्या दालनांत आले. सर्व मुलींना हळदकुंकूं दिलं, पानसुपारी दिली, अत्तर गुलाब झालं. फुलांच्या वेण्या दिल्या, आणि खण, पातळं देऊन निरोप दिला.

या मुलीला खण पातळ दिलं नाहीं, व निरोप पण दिला नाहीं, शेवटीं तीच म्हणाली,

" महाराज, मी जातें आतां "

" कां ! घाई कां इतकी ? आंत चल ना ! "

युवराजांनीं तिला दुसरे कपडे आणवून दिले. व म्हणाले:—

" जा—आंत जा, कपडे बदल."

तिनें कपडे बदलले, तिला युवराजांनीं पुन्हा हांक मारली.

" बैस ना. नांव काय तुझं ? तुझी हकीकत सांग ना.

"माझं नांव मनोरमा; पण फुलराणी म्हणतात मला."

" फुलराणी ? वा ! अगदीं योग्य नांव आहे हं ! पण हकीकत सांग ना तुझी."

" महाराज काय करायचं आहे माझ्या हकी-कतीशीं ? मी एक गरीब कामकरी मुलगी आहे. बरं द्यावी परवानगी, जातें मी आतां. "

पण सांग तर खरी ! जाशील नंतर ! काय घाई आहे ? तिनें सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून युवराजांना फारच वाईट वाटलें. ते म्हणाले—

" मनोरमे, तूं वाईट वाटून घेऊं नको. यापुढें तुझे दुःखाचे दिवस संपले आहेत. तूं या देशाची युवराज्ञी होशील, फुलराणीची महाराणी होशील."

" महाराज माझी काय थट्टा करतां ? माझी काय योग्यता आहे त्या ठिकाणीं बसण्याची ? मी एक गरीब खेडवळ मुलगी, ना मला शिक्षण ना मला ज्ञान. मला हें सगळं कसं कळेल ? साध्या माणसांचा प्रपंच करायचा म्हणजे कोण जबाबदारी ! आणि हा तर एवढ्या मोठ्या राज्याचा संसार सांवरायचा ! कसा होईल माझ्या हातून ? "

" होईल सगळं, न व्हायला काय झालं फुलराणी ?"

" नाहीं व्हायचं महाराज, पुष्कळ मुली आहेत दुसऱ्या, आपल्या योग्यतेच्या. त्यांतून निवडावी आपण; मी केवळ मजा पाहण्यासाठीं आलें होतें. मला कल्पनाहि नव्हती कीं, आपण मलाच पसंत कराल आपण. परीक्षा करून दुसरी एखादी चांगली मुलगी पसंत करावी."

" फुलराणी, मी परीक्षा केली नाहीं, असं का तुला वाटतं? योग्यता न जाणतां उगीच कुणाला तरी करीन मी आपली जोडीदारीण? दारांत उगीच नव्हतीं पडलीं फुलं फुलराणी, मी मुद्दाम टाकलीं होतीं तीं! आणि पुस्तक तरी उगीचच कसं पडेल दारांत?"

" म्हणजे मुद्दाम टाकलीं होतीं कीं काय तीं फुलं नी पुस्तकं? मी उगीचच उचललीं म्हणायचीं?

" छे छे! तसं नाहीं काय! तूं उचलावीस म्हणूनच टाकलीं होतीं बरं का! इतक्या मुली आल्या पण त्यांपैकीं कुणीही त्या वस्तु उचलल्या नाहींत! सर्वजणी आपल्याच तोऱ्यांत आणि ऐटींत! प्रत्येकीला वाटायचं, तें नोकर करतीलच कीं म्हणून.

कित्येक खुशाल लाथाडून गेल्या. मला त्याचं कांहिंचि का वाटलं नसेल फुलराणी ? ज्यांना फुलांना चिरडतांना कांहिंच वाटत नाहीं त्यांना माणसांबद्दल काय प्रेम वाटणार ? त्यांना ज्ञानाचं तरी काय महत्त्व कळणार? तूं प्रेम आणि ज्ञान दोन्हीहि जवळ केलंस ! मला आपल्या प्रजेशीं व माझ्याशीं प्रेमळपणानं वागणारी शहाणी पत्नी हवी; आणि म्हणूनच मी तुला पसंत केलं आहे. तुला आवडली का माझी पसंती !

" मग मला तुम्हीं माझ्या पांखरांतून हिंडूं फिरूं देणार नाहीं, कोंडून ठेवाल होय ना ?

" वा ! फिरूं देणार तर ! नाहीं कां म्हणून ? पांखरांबरोबर फुलांबरोबर मुलांना पण देणार आणखीन् ! फीर ना हवी तितकी सगळ्या देशभर !! सगळीं पाखरं, सगळीं फुलं अन् सगळीं मुलं तुझींच आहेत मग !"

"पण आपण आईसाहेबांना विचारून काय तें करावं"

" बरं, तसं करूं या, चल तिकडेच जाऊं या आपण "

युवराजांनीं आईसाहेबांना ही मुलगी पसंत असल्याचं सांगितलं. त्या म्हणाल्या " अँ, या जमलेल्या

इतक्या सुंदर व वैभवसंपन्न मुलींतून ही का गारगोटी पसंत पडली ? 'लंकेची पार्वतीच' दिसते आहे ? "

युवराज म्हणाले,

" वा ! ही का गारगोटी ? हें तर रत्न आहे आई साहेब ! तिची कल्पकता तर पाहा; ती गरिबीमुळं सगळ्या गोष्टी अशक्य असतांनाही भ्याली नाहीं. बुजली नाहीं. निराश झाली नाहीं, घाबरली नाहीं, तर मोठ्या कल्पकतेनं, चातुर्यानं सर्व गोष्टी साध्य केल्या तिनं ! स्मशानांत स्वर्ग निर्माण केला ! सर्वांचे डोळे दिपवले, केवढं बुद्धिवैभव आहे तिचं ! काय किंमत आहे त्याच्या पुढं दुसऱ्या वैभवाची ? कशाला पाहिजे तें ? "

" पण आपल्या तोलाची तरी नको का ? किती हुषार असली म्हणून काय झालं ? दुसरी पसंत करावी !

" आईसाहेब, मला नाहीं दुसरी मुलगी पसंत ! मी परीक्षा केली सव मुलींची, ही एकच उतरली त्यांत ! आईसाहेब, मींच टाकलीं होतीं तीं गुलाबाचीं फुलं दारांत. पण एकाहि वैभवसंपन्न मुलीला पायदळीं पडलेलीं तीं फुलं उचलायची इच्छा झाली नाहीं.

(..२०..)२९३३

त्यांच्या वैभवाचा काय उपयोग होणार लोकांना ? मी दारांत टाकलेल्या पुस्तकाला एकाहि रत्नाचा हात लागला नाहीं ! हिनंच तीं पायदळीं पडलेलीं फुलं उचलून प्रेमानं हृदयाशीं धरलीं ! पायांत पडलेलं पवित्र पुस्तक—रामचरित्र—उचलून मस्तकाला लावलं आणि योग्य जागीं नेऊन ठेवलं, मी स्वतः लग्नाबद्दल विचारलं असतांना " आईसाहेबांना विचारून काय तें करावें, म्हणूनही हिनंच सांगितलं ! आईसाहेब, अशी सून तुम्हाला आवडणार नाहीं काय ? अशी उद्यांची राणी तुम्हाला योग्य वाटत नाहीं काय ? सांगा ना आईसाहेब ? "

" बाळ, तुमच्या इच्छेप्रमाणें करा. मला काय करावयाचं आहे ? तुमच्या मनाप्रमाणें झालं म्हणजे झालं, तुमच्या परीक्षेला उतरली असली ती म्हणजे आणि काय पाहिजे ? ठरवून टाका झालं ! "

युवराज मनोरमा यांना खूप आनंद झाला ! त्यांचं लग्न मोठ्या थाटामाटानं झालं.

फुलराणी पट्टराणी झाली
पर्णांतल्या सोबत्यांना विसरली :

IRBK-0103133

# बाल मित्र माला

★

## आमचे सण

★

१ तिळगूळ घ्या गोड बोला
२ महाशिवरात्र
३ दास नवमी
४ होळी
५ सोन्याचा दसरा
६ नाग पंचमी
७ वसंत गौरी
८ राखी पुनव
९ गोकुळचा कान्हा
१० हरितालिका

इतर

१ राया अथवा बाळ मूर्तिकार
२ गुलाबकळी
३ फुलराणी

★

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.

न्यू मनोहर प्रेस, मुंबई ४.